(८३)

| | |
|---|---|
| | **प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय**<br>अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, पहिला माळा, बी विंग<br>वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर ००१ ४४०<br>दुरध्वनी क्रं२५५६९१६-०७१२ . , ई -मेल- apccfnodal@mahaforest.gov.in |

क्रमांक कक्ष-१७/१/नोडल/गडचि/ID-१३२३४/२०७ /२०२२-२०२३
नागपूर ४४० ००१, दिनांक:२६/०४/२०२२

**विषय:-** Proposal for Trenching and Laying २४ fibre BSNL OFC Line Bhagwanpur to Sawalkheda under NOFN Project, Ta. Kurkheda Dist. Gadchiroli Area ०.२०४७५ हे.

**संदर्भ:-** १) वनसंरक्षक (प्रा.), गडचिरोली यांचे पत्र क्र. कक्ष-२(८)/जमिन/प्र.क्र.OFC/BSNL/२०२२/ /१३६०,दिनांक ०८/०३/२०२२ \|पृ. ७०

२) वनसंरक्षक (प्रा.),गडचिरोली यांचे पत्र क्र.कक्ष-२(८)/जमीन/प्र.क्र./जमिन/OFC/२०२२/५६, दिनांक ११/०४/२०२२ \|पृ. ८२

संदर्भ पत्र १ अन्वये प्राप्त प्रस्तावाची तपासणी केली असता त्यामध्ये एकुण १ ते ९ त्रुटी निदर्शनास आलेल्या असुन त्याची पुर्तता करण्यास या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-१७/नोडल/आयडी-१३२३४/गड/२७१६, दि.१६/०३/२०२२ \|पृ. ७२ अन्वये आपले कार्यालयास निर्देश देण्यात आलेले होते. त्याअनुषंगाने संदर्भ पत्र २ अन्वये सदर १ ते ९ मुंद्याबाबत आपले कार्यालयाने अनुपालन अहवाल सादर केलेला आहे. त्याची तपासणी केली असता खालील त्रुटीची पुर्तता अपेक्षित आहे.

१. प्रस्तावीत ऑप्टीकल फायबर केबल लाईन करिता ०.२०४७५ हे. वनक्षेत्राची आवश्यकता आहे. परंतु ऑनलाईन पार्ट-१ मध्ये Village wise Breakup, Component wise Breakup, पार्ट-२, Site Inspection Report, Minimum Demand of Forest Area (Dy.C.F.Certificate), NPV Certificate, (पृष्ठ क्र. ३२,१५) व पृष्ठ क्र.१२ वरिल प्रमाणपत्रामध्ये ०.२०६ हे. क्षेत्राबाबत नोंद आहे. त्यामुळे परिवेश व उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे सर्व ठिकाणी आवश्यक असलेल्या क्षेत्राचे म्हणजे ०.२०४७५ हे. क्षेत्राबाबत दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

२. क्षेत्र विवरणाचा जो तपशिल सादर केलेला आहे, त्यावर प्रकल्प यंत्रणेच्या अधिकारी यांची स्वाक्षरी नसून कार्यालयाचा शिक्का उमटवलेला नाही.

३. ग्रामपंचायत सावलखेडा येथील सरपंच/सचिव यांनी नाहरकत प्रमाणपत्र सादर केलेले आहे. त्यामध्ये भगवानपुर ग्रामपंचायतीचा उल्लेख केलेला आहे. त्याऐवजी सावलखेडा असा उल्लेख करावा.

४. प्रस्तावित क्षेत्र व पर्यायी वनीकरण क्षेत्राची KML File CD Read होत नाही. सदर KML File Online पध्दतीने सादर केली आहे. असा खुलासा उपवनसंरक्षक, वडसा वनविभाग, वडसा यांनी त्यांचे दि. ०४/०४/२०२२ चे पत्रात केलेला आहे. त्याअनुषंगाने त्यांनी प्रस्तावित क्षेत्र व पर्यायी वनीकरण क्षेत्राची KML File CD Read होत नाही. म्हणुन KML File ची CD सादर न करणे उचित नाही. त्यामुळे सदर KML File ची वाचनीय CD सादर करावी. \|पृ. ८०

५. संबंधित वनसंरक्षक/उपवनसंरक्षक यांचेकडुन वरिष्ठ कार्यालयास प्रस्ताव सादर करतांना त्यांचे स्तरावर बारकाईने तपासणी करुन परिपुर्ण प्रस्ताव सादर केल्या जात नाही. याबाबत यापुर्वी सुध्दा आपणांस लेखी सुचना निर्गमित करण्यात आलेल्या असुन सुध्दा त्याकडे हेतुपुरस्पर दुर्लक्ष केल्या जाते, हे सदर प्रस्तावाचे तपासणी अंती दिसुन येते. त्यामुळे यापुढे अशी पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. याबाबत उपवनसंरक्षक वडसा वनविभाग, वडसा यांनी यापुढे पुनरावृत्ती होणार नाही, याची दक्षता घेण्यात येईल, असे लेखी स्वरुपात कळविले असुन त्यांनी उपरोक्त उपस्थित १ ते ४ त्रृटीबाबत त्यांचेस्तरावर तपासणी केल्याचे दिसुन येत नाही, असे स्पष्ट होते. त्यामुळे वनसंरक्षक/उपवनसंरक्षक यांना पुन्हा निर्देश देण्यात येते की, अशा प्रकरणाची पुनरावृत्ती पुन्हा होणार नाही, याबाबत दक्षता घेण्यात यावी. **सदर प्रस्तावाच्या दोन प्रती यासोबत परत करण्यात येत आहे.**

२६/५/२२

(नरेश झुरमुरे)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी

**प्रति,**

वनसंरक्षक (प्रा.),
गडचिरोली वनवृत्त,
गडचिरोली

प्रतिलिपी:- उपवनसंरक्षक (प्रा.) वडसा वनविभाग, वडसा यांना माहिती व उचित कार्यवाहीस अग्रेषित.

प्रतिलिपी:- उपमहाप्रंबधक, भारत संचार निगम लिमिटेड, गडचिरोली यांना माहिती व पूढील कार्यवाही अग्रेषित.